दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
आपण जे पण आहोत ते, आपल्या विचारांचे फळ आहोत.
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरवार १९ जून २०२५ | अंक १८२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# माध्यमांशी बोलत असताना फडणवीसांच्या जवळच ड्रोन पडला, देहूमध्ये नेमकं काय घडलं?

संत तुकाराम महाराज यांच्या 340 व्या पालखी सोहळ्याला आजपासून सुरुवात झाली आहे. आज पालखीचं पंढरपूरकडे प्रस्थान झालं आहे. याचदरम्यान एक मोठी बातमी समोर आली आहे, ती म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देहूमध्ये प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देत असतानाच मुख्य प्रवेशद्वाराजवळ ड्रोन पडण्याची घटना घडली आहे. हा ड्रोन मुख्यमंत्री फडणवीस यांच्यापासून अवघ्या पाच ते दहा फुटांच्या अंतरावर पडला. सुदैवानं या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नाहीये. ड्रोन खाली पडल्यानंतर पोलिसांकडून तो जप्त करण्यात आला आहे.नेमकं काय घडलं? आजपासून संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याला सुरुवात झाली आहे.पालखीचं पंढरपूरकडे प्रस्थान झालं आहे. याचदरम्यान ही घटना घडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे माध्यमांना प्रतिक्रिया देत होते. याचदरम्यान हा ड्रोन मुख्य प्रवेशद्वाराजवळ पडला. हा ड्रोन मुख्यमंत्री फडणवीस यांच्यापासून अवघ्या पाच ते दहा फुटांच्या अंतरावर पडला. सुदैवानं या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नाहीये, पोलिसांनी हा ड्रोन जप्त केला आहे.



## ड्रोनद्वारे चित्रिकरण

आज संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याला सुरुवात झाली आहे, या पालखी चित्रिकरण ड्रोनच्या माध्यमातून केलं जातं. पालखीचं चित्रिकरण सुरू असतानाच हा ड्रोन खाली कोसळल्याची घटना घडली आहे, देवेंद्र फडणवीस यांच्याजवळ अवघ्या पाच ते दहा फूट अंतरावर हा ड्रोन खाली कोसळला. त्यानंतर पोलिसांनी हा ड्रोन जप्त केला आहे.दरम्यान दुसरीकडे अलंकापुरीमध्ये देखील वारकऱ्यांचा मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी प्रस्थान सोहळा आणि वारीमध्ये सहभागी होण्यासाठी राज्यातील आणि राज्याबाहेरील अनेक वारकरी अलंकापुरीत दाखल झाले आहेत, विठूरायाच्या दर्शनाची आस या वारकऱ्यांना लागली आहे. देहू आणि आळंदीमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. वारकऱ्यांनी या ठिकाणी मोठी गर्दी केली आहे. विठ्ठलाच्या नामाचा जयघोष सुरू आहे. वारकीर मोठ्या उत्साहान वारीमध्ये सहभागी झाले आहेत.

# अनुसूचित जाती जमाती समितीचे सदस्य गोरख लोखंडे यांनी घेतला ऊसतोड महिला आरोग्य बाबतचा आढावा

बीड दि. १८ ( जिमाका ) :- ऊसतोड कामगार महिलांच्या आरोग्याबाबत असलेल्या विविध समस्यांचा आज अनुसूचित जाती जमाती समितीचे सदस्य गोरख लोखंडे यांनी बीड येथे एका बैठकीत आढावा घेतला.बीड येथील पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत त्यांनी याबाबत आढावा घेताना ऊसतोड महिला कामगार महिलांची ऊसतोडणीस जाण्यापूर्वी व तोडणी वरून परत आल्यानंतर अशा दोन्ही वेळा आरोग्य तपासणी करण्याच्या सूचना दिल्या. अवैधरित्या महिलांचा गर्भपात केला जातो अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत



असे आढळून आल्यास त्याबाबत गुन्हा दाखल करण्यात यावा अशाही सूचना त्यांनी यावेळी दिल्या.आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी वेळोवेळी अचानकपणे खाजगी रुग्णालयांची तपासणी करावी तसेच सर्व खाजगी रुग्णालयांमध्ये तक्रार करण्यासाठीचा टोल फ्री क्रमांक दर्शनी भागात लावण्यात यावा असेही ते म्हणाले. ग्रामपंचायत गर्भवती महिलांची माहिती आरोग्य विभागाने आशा सेविका तसेच अंगणवाडी सेविका यांच्या माध्यमातून गोळा करावी व यापुढील काळात अवैधपणे गर्भपात होणार नाहीत याची खबरदारी घ्यावी असेही लोखंडे यांनी यावेळी सांगितले.आज झालेल्या या बैठकीत नवनीत कौवत पोलीस अधीक्षक बीड, सचिन पांडकर अप्पर पोलीस अधीक्षक बीड, पूजा पवार प्रभारी पोलीस स्टेशन पिंपळनेर, डॉ संतोष शहाणे अतिरिक्त जिल्हा शिल्लचिकित्सक बीड, तत्त्वशील कांबळे सामाजिक कार्यकर्ते बीड, गोरे साहेब समाज कल्याण बीड नितीन पतंगे समाज कल्याण बीड आदींची उपस्थिती होती.

# बीड ते पंढरपूर आषाढी वारी दिव्यरथ पालखी सोहळा



बीड प्रतिनिधी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली आळंदी देवाची यांचे आजोबा ब्रह्मलीन गोविंद पंत महाराज यांचा आषाढी दिव्यरथ पालखी सोहळा दिनांक२५ जून , २०२५ बुधवारी रोजी बीडहून प्रस्थान करणार आहे हा आषाढी पायी वारी पालखी सोहळा मजल दर मजल करत श्रीक्षेत्र पंढरपूर कडे मार्गक्रमण करत हरिनामाच्या गजरात व पांडुरंगाच्या भक्तीत तल्लीन होऊन भाविक भक्त सहभागी होणार आहेत. प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी रात्री हरी जागर व किर्तन सेवा संपन्न होणार आहे .आषाढी वारी निमित्त या पायी वारी सोहळ्यामध्ये जास्तीत जास्त संख्येने भाविक भक्तांनी सहभागी होऊन वारीचा आनंद घ्यावा व या पायीवारी पालखी सोहळ्यात सहभागी व्हावे असे आवाहन संस्थांचे अध्यक्ष व दिंडी प्रमुख हभप सुग्रीव महाराज डाके ,श्रीमंत (अण्णा) वाघमारे, ह भ प राधाकृष्ण वाव्हळ महाराज यांनी कळिवले आहे . या दिव्य रथ पालखी सोहळ्याचे पंढरपूर येथील मुक्कामाचे ठिकाण आहे दिनकरराव (सरपंच) चव्हाण यांचा मळा श्रीक्षेत्र पंढरपूर . ज्या भाविक भक्तांना या आषाढी पालखी सोहळ्यामध्ये सहभागी व्हायचे आहे त्यांनी खालील नंबर वर संपर्क करावा असे सुग्रीव महाराज डाके कळवतात मो. न. ७७९८१९६२२१

# बोगस कामगारांची नोंदणी तात्काळ रद्द करण्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

बीड-प्रतिनिधी जिल्ह्यामध्ये बांधकाम कामगारांची बोगस नोंदणी अनेकांनी केलेली असून बोगस कामगारांची नोंदणी बाबत पडताळणी करून रद्द करण्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे मनसेचे जिल्हासचिव सोमेश कदम यांनी केली आहे. पुढे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्हा हा मजूर जिल्हा म्हणून ओळखला जात असून बहुतांश नागरिक हे मोलमजुरी करून उपजीविका भागवतात. राज्य शासनाने बांधकाम कामगारांसाठी सुरू केलेल्या योजनेचा लाभ खरे बांधकाम कामगार यांना मिळत नसून यावर धनदांडग्या, नोकरदार वर्गाच्या कुटुंबाने देखील लाभ घेतल्याची माहिती समोर येत असून, यामुळे खरे बांधकाम मजूर कामगार हे योजनेपासून वंचित राहत असून बोगस बांधकाम कामगाराची नोंदणी कायमस्वरूपी रद्द करण्यात यावी मनसेची मागणी मान्य न केल्यास उपोषणाचा इशारा पत्रकातून देण्यात आलाआहे.

# बीड शहरात पार्किंग दाखवा - बक्षीस मिळवा योजना राबविण्याची मागणी

बीड दि,१८ जून-लोक इच्छा प्रतिनिधी बीड शहरातील झमझम कॉलनी व नर्सरी रोड परिसरात असलेल्या खासगी इंग्रजी शाळांमुळे या भागात दररोज सकाळी आणि दुपारी प्रचंड वाहतूक कोंडी निमर्‍ण होत आहे. शाळांच्या आजूबाजूला नियोजित पार्किंगची सुविधा नसल्याने ऑटो रिक्षा, दुचाकी व पालकांची गर्दी वाढत असून, याचा फटका स्थानिक रहिवाशांना आणि इतर नागरिकांना बसत आहे. या भागात शाळा सुटण्याच्या आणि सुरू होण्याच्या वेळेस रस्त्यावर अक्षरशः गोंधळाची स्थिती निर्माण होते. झमझम कॉलनीतील टोलेजंग इमारती समोरच फोर व्हीलर पार्किंग केलेल्या रस्ते अरुंद असून, तिथे मोठ्या प्रमाणात वाहने उभी केली जातात. यामुळे रुग्ण, वृद्ध नागरिक आणि महिलांना रस्त्यावरून चालणे कठीण झाले आहे. ङ्गपार्किंग दाखवा - बक्षीस मिळवाफ योजना राबवा नागरिकांच्या तक्रारी आणि वाढत्या त्रासाचा विचार करता प्रशासनाने मपार्किंग दाखवा - बक्षीस मिळवाफ ही योजना लागू करावी, अशी मागणी होत आहे. या योजनेअंतर्गत शाळांनी स्वतःच्या जागेत किंवा जवळपास भाड्याने जागा घेऊन पालकांसाठी स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था करावी. जर शाळा अशी व्यवस्था करते, तर त्यांना पालिकेकडून सन्मानपत्र किंवा प्रोत्साहनात्मक आर्थिक मदत दिली जावी, असा प्रस्ताव समोर येत आहे. नागरिकांच्या प्रतिक्रिया शाळांच्या कारणामुळे आमचं घराबाहेर पडणंही कठीण झालं आहे. रोजचा गोंधळ आणि हॉर्न यामुळे मानसिक त्रास होतोय.ङ्ग - स्थानीक रहिवासी, झमझम कॉलनी ङ्गशाळांना मान्यता देताना पार्किंगचा आराखडा विचारात घेतला पाहिजे, नाहीतर त्यांची मान्यता रद्द करावी. प्रशासनाची भूमिका आवश्यक या गंभीर समस्येकडे पालिका, शिक्षण विभाग आणि वाहतूक पोलीस विभाग यांनी तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. शाळांनी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी उपाययोजना केल्या नाहीत तर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे आवश्यक ठरेल. त्याचबरोबर, जागरूक पालक व नागरिकांनीही नियमांचे पालन करणे गरजेचे आहे.

# लिलाताई उजगरे यांचा अमृतमहोत्सव संपन्न

माजलगाव-प्रतिनिधी उजगरे नाना आणि लिलाताई उजगरे हे दांपत्य भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून दीर्घ काळ धम्म कार्यात झोकून दिले होते नानांच्या निधनानंतरही ताईंनी न थांबता धम्म चळवळीचे कार्य अखंडपणे सुरू ठेवले, आणि समाजासाठी एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला. उजगरेताई यांनी भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षिका व विविध पदावर काम करुन धम्म चळवळ गतीमान करण्याचे कार्य सातत्यान केले सध्या त्या भारतीय बौद्ध महासभा बीड पुर्व च्या मजिल्हा संस्कार उपाध्यक्षाफ म्हणून कार्यरत आहेत.त्यांची निष्ठा, समर्पण आणि आंबेडकरी विचारांप्रती असलेली अढळ आस्था ही नव्या पिढीसाठी मार्गदर्शक आहे. त्याचा ७५ वा अमृतमोहत्सव सौभाग्य मंगल कार्यालय केसापुरी कॅम्प येथे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पुजन लिलाताई उजगरे, चंद्रशेखर उजगरे,अमोल उजगरे ,व मुली जावई यांच्या हस्ते करुन धम्म वंदनेने करण्यात आली त्या नंतर भारतीय बौद्ध महासभा, सदधम्म सेवा संघ, यशोधरा बुद्ध विहार व अनेक उपस्तीत धम्म उपासकांकडुन गौरव करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन बहुजन विकास मोर्चा चे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे हे होते या कार्यक्रमासाठी पुज्य भन्ते पय्यातीस महाथेरो यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभेचे, एस बी मोरे,शामभाऊ वाघमारे, डॉ भागवत साळवे, के व्ही साळवे,कचरुतात्या खळगे, अंकुश आण्णा, जाधव,श्रीहरीनाना मोरे,अविनाश तात्या जावळे, पांडुरंग जाधव,जि एन घनघाव, बाबासाहेब जाधव मंदाताई साळवे,हरिबाई टाकणखार, शोभाताई भोजने,सह सामाजीक, धार्मीक, राजकिय क्षेत्रातील मान्यवर यांची उपस्तीती होती या ठिकाणी ज्ञानलिला या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले

# आरोग्यदूत मंगेश चिवटे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा रुग्णसेवक शरद झोडगे,रुग्णसेवक शिवराज आंधळकर यांचे आयोजन

बीड प्रतिनिधी - रुग्णसेवा म्हणजे ईश्वर सेवा याचं ज्वलंत उदाहरण म्हणजे मंगेश दादा चिवटे, गेल्या अनेक वर्षापासून मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून अनेक गरजू रुग्णांना मदत करणारे, महाराष्ट्राचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे विश्वासु तथा शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे संस्थापक, उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी प्रमुख मंगेश चिवटे सर हे सर्वांना परिचित आहेतच.वाढदिवस म्हटलं की केक हारे,तुरे,डीजे असा अवाढव्य खर्च आला परंतु या खर्चाला फाटा देत शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष बीड, धर्मवीर प्रतिष्ठान, बाजीराव दादा चव्हाण मित्रपरिवार व रुग्णसेवक शरद झोडगे आणि रुग्णसेवक शिवराज आंधळकर यांच्या माध्यमातून मंगेश दादा चिवटे यांचा वाढदिवस बीडमध्ये विविध सामाजिक उपक्रम घेऊन साजरा केला यामध्ये भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले होते या शिबिरामध्ये जो रक्तदान करेल त्याला एकनाथ रक्तदाता सुरक्षा कवच योजना म्हणून दशलक्ष रुपयांचा अपघाती विमा मोफत देण्यात आला, यानंतर बीड शहरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्र येथे अन्नदान व फळ वाटप कार्यक्रम आयोजित केला होता.





जिव्हाळा वृद्धाश्रमातील शुभेच्छा मंगेश दादा चिवटे यांनी व्हिडिओ कॉलद्वारे स्वीकारल्या व रुग्णसेवक शरद झोडगे व रुग्णसेवक शिवराज आंधळकर आणि बाजीराव दादा चव्हाण मित्रपरिवाराचे आभार व्यक्त केले.कार्यक्रमाला उपस्थित शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख महादेव मातकर, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष उपजिल्हाप्रमुख रुग्णसेवक शरद झोडगे,शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष उपजिल्हाप्रमुख रुग्णसेवक शिवराज आंधळकर, युवा नेते अजय जाधव, सुरज निमळ,संकेत पाळवदे, किशोर हंगे, सौरभ कुचेकर, हुसेन शेख, सचीन हेगडे, गजानन हेगडे आदी पदाधिकारी व मित्रपरिवार उपस्थित

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरवार १९ जून २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## इंद्रायणी नदी वरील लोखंडी पूल कोसळून दुर्घटना

कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवरील लोखंडी पूल कोसळून दुर्घटना हा पर्यटकांचा अतिउत्साह आणि प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष यांचा परिणाम म्हणावा लागेल. या दुर्घटनेत चार जणांचा बळी गेला आणि पन्नासहून अधिक जखमी झाले. दुसरीकडे माथेरानमध्ये शार्लेट तलावात बुडून तिघांचा मृत्यू झाला. आणि राज्यात विविध ठिकाणी अशा दुर्घटनांत एकाच दिवसात नऊ जणांचा बळी गेला. पावसाळ्याच्या प्रारंभीच सुरू झालेल्या या दुर्घटनांकडे केवळ अपघात म्हणून पाहता येणार नाही. शहरांपासून थोडी दूर, निसर्गरम्य आणि पर्यटकांना खुणावणारी अशी ठिकाणे किती असुरक्षित आहेत, हे या घटनांवरून दिसते. अशा ठिकाणी दुर्घटना घडली, की जनक्षोभ उफाळून येतो, यंत्रणा जाग्या होत्यात, मंत्री-अधिकारी अपघातस्थळी जाऊन उपाययोजना जाहीर करतात, अन् कालांतराने सारे विसरले जाते. पुन्हा एखादी दुर्घटना घडली की याच गोष्टी याच क्रमाने होतात. कोणत्याही दुर्घटनांतून आपण धडा घेत नाही; अन्यथा कुंडमळा येथील दुर्घटना घडलीच नसती. कुंडमळा परिसरात पावसाळ्यात फुलून जाणाऱ्या निसर्गाच्या सान्निध्यात पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी हजारो आबालवृद्धांची दर वर्षी गर्दी होते. नदीच्या दोन्ही तीरांवरील गावांतील लोकांसाठी तीस-पस्तीस वर्षांपूर्वी लोखंडी पूल बांधण्यात आला होता. रविवारी या भागात लोकांची झुंबड उडाली होती. जीर्ण झालेल्या या पुलावर क्षमतेपेक्षा अधिक गर्दी झाल्याने पूल कोसळला, असे सांगण्यात येते. परवानगी नसतानाही काही दुचाकीस्वारांनी पुलावर वाहने नेल्यामुळे ही दुर्घटना घडली, असेही ही घटना पाहणारे सांगतात. ही दोन्ही कारणे प्रशासनाचे अपयश दर्शवतात. हा पूल धोकादायक झाला असून, नवा पूल उभारण्याची मागणी नागरिक करीत होते. बऱ्याच तक्रारी-पाठपुराव्यानंतर गेल्या वर्षी त्यासाठी निधीही मंजूर झाला; मात्र प्रत्यक्ष कार्यादेश निघण्यास दीड वर्षाचा विलंब झाला. काही दिवसांपूर्वीच निविदा मंजुरी झाल्याचे सरकार सांगत असले, तरी या कामाला मुहूर्त मिळण्यास सरकार आणि प्रशासन एखादी दुर्घटना घडण्याचीच जणू वाट पाहत होते. चार निरपराधांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या या अक्षम्य बेफिकिरीची तातडीने चौकशी होऊन दोषींना शिक्षा झाली पाहिजे. हजारो कोटी रुपयांचे नवनवे प्रकल्प काही वर्षांत उभारणाऱ्या आणि त्याचा गाजावाजा करणाऱ्या सरकारी यंत्रणांमध्ये आठ कोटी रुपयांचा नवा पूल उभारण्यासाठीची लालफितशाही नागरिकांच्या जीवावर बेतली आहे. या प्रकारानंतर राज्यातील सर्व जुन्या पुलांचे ङ्गस्ट्रक्चरल ऑडिटफ करण्याची सरकारी घोषणा झाली आहे. रायगडमध्ये एका जुन्या पुलावरून बस पाण्यात गेल्याच्या घटनेनंतर तत्कालीन मंत्र्यांनी अशा ङ्गऑडिटफची घोषणा केली होती, त्यानंतर आजवर या यंत्रणांनी काय दिवे लावले, हेदेखील एकदा समोर आले पाहिजे. होर्डिंग कोसळले, पूल पडले, की रंगसफेदीपुरत्या तपासणीच्या घोषणा होतात; प्रत्यक्षात दुर्घटनांची मालिका सुरूच राहते, हे महाराष्ट्रातले दुर्दैवी वास्तव बनले आहे. हा पूल धोकादायक झाल्याचा फलक लावण्यात आला होता, असे प्रशासनाकडून सांगण्यात येते. नागरिकांच्या जीविताची किती ही काळजी! केवळ फलक लावून, ङ्गस्ट्रक्चरल ऑडिटफसारख्या घोषणा करून आणि मृतांच्या नातेवाइकांना भरपाई देऊन या यंत्रणा दुर्घटनेबाबत हात झटकू पाहत आहेत. पर्यटकांना रोखण्यासाठी प्रत्येक ठिकाणी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती शक्य नाही, हे मान्य आहे; मात्र पर्यटकांमध्ये लोकप्रिय असलेल्या आणि हजारो नागरिक जमणाऱ्या ठिकाणी तरी अशी व्यवस्था करणे, ही यंत्रणांची किमान जबाबदारी आहे.

# जागतिक वातावरणातील बदल : शेतकऱ्यांसमोरील संधी आणि आव्हाने

जागतिक वातावरणातील बदल हे आजच्या काळात शेतकऱ्यांसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. अनियमित पाऊस, वाढते तापमान, नैसर्गिक आपत्त्यांची वाढती संख्या यामुळे शेतीचे उत्पादन घटत आहे आणि शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन कोलमडत आहे. काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान होते, तर काही ठिकाणी दुष्काळामुळे पेरणी होत नाहीत. यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. परंतु, या आव्हानांमध्ये काही संधी देखील दडलेल्या आहेत. हवामान बदलांना तोंड देण्यासाठी नवीन तंत्रज्ञान आणि पीक पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, कमी पाण्यात येणारी पिके घेणे, दुष्काळ प्रतिरोधक वाणांचा वापर करणे, तसेच आधुनिक सिंचन पद्धती (ठिबक सिंचन, तुषार सिंचन) वापरणे फायदेशीर ठरू शकते. सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती आणि एकात्मिक शेती पद्धतींचा अवलंब केल्यास जमिनीची सुपीकता टिकून राहते आणि रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी होते. याशिवाय, सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जा यांसारख्या अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा शेतीत वापर केल्यास विजेवरील खर्च कमी होतो आणि कार्बन उत्सर्जनही घटते. हवामान बदलांशी जुळवून घेण्यासाठी शेतकऱ्यांनी हवामान अंदाजाचा अभ्यास करणे, कृषी विद्यापीठ आणि कृषी विभागाच्या सल्ल्यानुसार पीक नियोजन करणे आणि पीक विमा योजनेचा लाभ घेणे महत्त्वाचे आहे. शासनानेही शेतकऱ्यांसाठी हवामान बदलांशी संबंधित धोरणे आखणे, संशोधन आणि विकासाला प्रोत्साहन देणे, तसेच शेतकऱ्यांना आर्थिक आणि तांत्रिक मदत पुरवणे आवश्यक आहे. योग्य नियोजन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि सामूहिक प्रयत्नांमुळे जागतिक वातावरणातील बदलांच्या आव्हानांवर मात करून शेतीला अधिक शाश्वत आणि फायदेशीर बनवता येईल. आव्हाने : आव्हाने : आव्हाने : आव्हाने : आव्हाने : हवामान बदलाचा शेतीवर अनेक प्रकारे नकारात्मक परिणाम होत आहे. सर्वप्रथम, अनियमित पर्जन्यमानामुळे शेतकऱ्यांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. काही भागांत अतिवृष्टी होते आणि त्यामुळे पूरपरिस्थिती निर्माण होते, शेतात पाणी साचते, पिके कुजतात आणि सुपीक माती वाहून जाते. दुसरीकडे, काही ठिकाणी पावसाचे प्रमाण कमी असते किंवा पाऊस अनियमित पडतो, त्यामुळे पेरण्या उशिरा होतात किंवा दुबार पेरणी करावी लागते. भूजल पातळी खालावत असल्यामुळे पाण्याचा ताण अधिक जाणवतो. अनेक भागांत पावसाचे प्रमाण कमी झाले आहे किंवा पावसाचा पॅटर्न अनियमित झाला आहे, त्यामुळे शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या पाण्याचा तुटवडा भासत आहे आणि भूजल पातळी सातत्याने खालावत चालली आहे. याशिवाय, अवकाळी पाऊस आणि गारपीट हेही मोठे आव्हान आहे; पिकांच्या काढणीच्या वेळी झालेल्या पावसामुळे किंवा गारपिटीमुळे कापूस, द्राक्षे, कांदा यासारख्या पिकांचे प्रचंड नुकसान होते. तापमानवाढीमुळे पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम होतो, कारण काही पिकांना विशिष्ट तापमानाची गरज असते आणि वाढत्या तापमानामुळे त्यांची वाढ खुंटते किंवा फुलोरा लागत नाही. उच्च तापमानामुळे प्रकाशसंश्लेषण प्रक्रिया अडथळले जाते, दाणे भरणे नीट होत नाही आणि एकूण उत्पादन घटते. पाण्याची गरजही वाढते, कारण बाष्पीभवनाचा वेग जास्त होतो, पण दुष्काळी परिस्थितीत हे शक्य होत नाही. तसेच, वाढत्या तापमानामुळे कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढतो, कारण बदललेल्या हवामानामुळे त्यांना पोषक वातावरण मिळते. जमिनीच्या आरोग्यावरही हवामान बदलांचा विपरीत परिणाम होतो. अतिवृष्टी व पुरामुळे सुपीक माती वाहून जाते आणि मृदधूप होते. काही कोरड्या भागांत बाष्पीभवनामुळे क्षार वर येतात आणि जमीन क्षारपड बनते. जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण कमी होऊन तिची सुपीकता आणि पाणी धरून ठेवण्याची क्षमता घटते. हवामान बदलांमुळे जैवविविधतेवरही परिणाम होतो; स्थानिक पिकांचे वाण वाचण्याच्या संकटात येतात आणि परागीकरण करणाऱ्या कीटकांची संख्या कमी होते, ज्यामुळे उत्पादन घटते. पशुधनावरही तापमानवाढ आणि चाऱ्याच्या कमतरतेमुळे ताण येतो, दुधाळ जनावरांचे उत्पादन कमी होते आणि आरोग्यावर परिणाम होतो. या साऱ्या कारणांमुळे शेती उत्पादन घटते, अन्नधान्याची उपलब्धता कमी होते, किमती वाढतात आणि अन्नसुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण होतो, विशेषतः गरीब व विकसनशील देशांमध्ये. पाण्याचा ताण, तापमान वाढ, कीड व रोगांचा प्रादुर्भाव, आणि जमिनीची धूप या साऱ्या गोष्टी मिळून शेती उत्पादनावर नकारात्मक परिणाम करतात. परिणामी, अन्नधा न्याची उपलब्धता कमी होते आणि अन्नसुरक्षेचा प्रश्न गंभीर होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना या आव्हानांना तोंड देण्यासाठी अधिक शाश्वत व विज्ञानाधिष्ठित उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. संधीं : संधीं : संधीं : संधीं : संधीं : जागतिक वातावरणातील बदल हे जरी शेतकऱ्यांसाठी आव्हानात्मक असले तरी त्यात अनेक संधीही दडलेल्या आहेत. हवामान बदलांना तोंड देण्यासाठी शास्त्रज्ञ दुष्काळ सहन करणारे, तापमानवाढ सहन करणारे आणि रोग-कीड प्रतिकारक नवीन पीक वाण विकसित करत आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांनी सुधारित वाणांचा वापर केल्यास उत्पादनात सातत्य राखता येते. पाणी व्यवस्थापनात ठिबक व तुषार सिंचनासारख्या सूक्ष्म सिंचन तंत्रांचा अवलंब केल्यास पाण्याची बचत होऊन पिकांना आवश्यक तेवढेच पाणी देता येते. पावसाचे पाणी साठवून शेततळी, बंधारे आणि बोअरवेल रिचार्जद्वारे भूजल पातळी वाढवता येते. तसेच आच्छादनाच्या (ींश्रलहळपस) मदतीने मातीतील ओलावा टिकवता येतो आणि सिंचनाची गरज कमी होते. सेंद्रिय व नैसर्गिक शेतीकडे वळल्यास जमिनीची सुपीकता वाढते, भूजल प्रदूषण टाळता येते आणि उत्पादनाला चांगली बाजारपेठ मिळते. शेतकऱ्यांनी सौर ऊर्जा पंप, बायोगॅस यंत्रे अशा पर्यायी ऊर्जेचा अवलंब केल्यास उत्पादन खर्च कमी होतो आणि पर्यावरणावर सकारात्मक परिणाम होतो. कृषी-वनिकी पद्धतीत शेताच्या बांधांवर झाडे लावल्याने मृदधूप कमी होते, जैवविविधता वाढते आणि शेतकऱ्यांना इंधन, फळे, लाकूड यांचे अतिरिक्त उत्पन्न मिळते. पीक विविधीकरणाचा अवलंब केल्यास एखाद्या पिकाचे नुकसान झाले तरी इतर पिकांमुळे उत्पन्नाचे विविध स्रोत टिकून राहतात आणि जोखीम कमी होते. हवामान स्मार्ट शेतीत सुधारित वाण, पाणी आणि मृद व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञान यांचा वापर करून उत्पादनक्षमता वाढवता येते, हरितगृह वायू उत्सर्जन कमी करता येते आणि हवामान बदलाशी जुळवून घेता येते. शिवाय, सेंद्रिय उत्पादनांना आणि हवामान अनुकूल नव्या पिकांना बाजारपेठेत वाढती मागणी आहे. कार्बन क्रेडिट्स आणि हरित उत्पादन योजनांमुळे शेतकऱ्यांना नवीन उत्पन्नाचे मार्ग खुले झाले आहेत. या सर्व संधींचा फायदा घेऊन शेतकरी आपली शेती हवामान बदलांना तोंड देण्यासाठी सक्षम आणि टिकाऊ बनवू शकतो.जागतिक वातावरणातील बदल हे शेतकऱ्यांसाठी एक मोठे संकट असले तरी, योग्य दृष्टिकोन, तंत्रज्ञानाचा वापर आणि दूरदृष्टीने याचा सामना केल्यास ते संधींमध्ये रूपांतरित होऊ शकते. शेतकऱ्यांनी या बदलांना सकारात्मक प्रतिसाद देणे आणि आधुनिक तसेच शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे. म्हणूनच, हवामान बदलाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी विज्ञानाधिष्ठित, पर्यावरणस्नेही आणि शाश्वत उपाययोजना स्वीकारणे गरजेचे आहे. शासनाच्या धोरणात्मक पाठबळासह शेतकऱ्यांनी नव्या तंत्रज्ञानाचा अंगीकार करणे आणि शेती पद्धतीत सकारात्मक बदल घडवणे ही काळाची गरज बनली आहे, जेणेकरून भविष्यातील अन्नसुरक्षा आणि शेतकऱ्यांचे जीवनमान टिकवता येईल.



डॉ. भागवत चव्हाण
सहायक प्राध्यापक,
कृषिविज्ञान विद्याशाखा,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

## विधानसभेतील आदिवासी आमदारांनी घेतली राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची भेट
# आदिवासी समाजातील विविध प्रश्नांवर चर्चा

विशेष प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

मुंबई : आदिवासी बांधवांना भेडसावणाऱ्या विविध समस्या व अडचणी विषयी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील आदिवासी आमदार व आदिवासी सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींच्या एका शिष्टमंडळाने बुधवार दिनांक १८-जून रोजी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची राजभवन, मुंबई येथे भेट घेऊन आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा केली. अनुसूचित जमाती आदिवासी समाजाचा व इतर पारंपरिक वननिवासांच्या अडीअडचणी संदर्भात धोरणात्मक निर्णय



व्हावा, अनुसूचित क्षेत्राला लागून असलेल्या पेसा कायदा अधिक प्रभावीपणे राबवून पेसा भागांमध्ये आदिवासी कर्मचाऱ्यांची भरती करणे, सध्याच्या आदेशातील विसंगती दूर करणे, अधिसंख्य पदे, अवैधरित्या जात प्रमाणपत्र रोकण्यासंदर्भात संबंधात कायदा करणे, आदिवासी विद्यापीठाची स्थापना करणे, आदिवासी मुलामुलींसाठी मुंबई व पुणे येथील विद्यापीठांमध्ये वसतिगृहे निर्माण करणे, प्रलंबित वनदावे निकाली काढणे, आदिवासी सल्लागार परिषदेच्या बैठकी वर्षातून दोनदा घेणे, यांसह विविध विषयांवर चर्चा झाली. बैठकीला आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, आमदार भीमराव केराम, राजेंद्र गावित, राजू तोडसाम, आमश्या पाडवी, नितीन पवार तसेच आदिवासी सामाजिक संघटनाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# महाराष्ट्र आधार सेनेच्या शाखा स्थापनेला धुमधडाक्यात सुरवात जिल्ह्यामध्ये अनेक शाखांचे नियोजन सुरु.

## बीड जिल्ह्यातील दिनदलित शोशितांना न्याय मिळवून देण्यासाठी व जातीयवादाच्या विरोधात महाराष्ट्र आधार सेना लढा उभारणार. - दिपक थोरात चिंचाळा डूकडेगाव मधून शाखा स्थापनेला सुरुवात.

वडवणी प्रतिनिधी- महाराष्ट्र आधार सेनेचे संस्थापक अध्यक्ष व सांज दैनिक महाराष्ट्र आरंभ चे संपादक दीपक भाऊ थोरात यांनी महाराष्ट्र आधार सेनेचा उद्घाटन सोहळा मोठ्या थाटात संपन्न केला व या सोहळ्याला उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा देऊन एक प्रकारे या संघटनेला आधार दिला आता या संघटनेमुळे महाराष्ट्रातील दिनदलित शोशितांना आता मात्र खंबीर आधार मिळाला आहे आजपर्यंत अनेक सामाजिक राजकीय संघटना दलित समाजातील बांधवांनी काढल्या परंतु संकटकाळी मात्र फार कमी संघटनेने अन्याय झालेल्या लोकांना आधार दिला परंतु आता महाराष्ट्र आधार सेना अन्याय विरोधात लढणार आहे ना जातीचा ना धर्माचा एक मदतीचा असे ब्रीदवाक्य घेऊन संघटना आता गोरगरिबांना सर्व जाती धर्मातील घटकांना सोबत घेऊन काम करणार आहे तसे पाहिले तर दीपक (भाऊ ) थोरात यांनी आजपर्यंत आपल्या आयुष्य समाजकार्यात घातले आहे आता इथून पुढे ते समाजाला न्याय देण्यासाठी झटणार असल्याचे त्यांनी सांगितले उद्घाटन सोहळ्याला हजारो कार्यकर्ते स्वखर्चाने उपस्थित राहिले नाहीतर एखादा कार्यक्रम ठेवायचा म्हटलं तर पैसे देऊनही लोक येत नाहीत परंतु काही न देता लोक आपल्या स्वतःच्या वाहनाने उपस्थित राहून आम्ही तुमच्या पाठीशी आहोत तुम्ही फक्त लढ म्हणा असे म्हणत उपस्थित राहून एक सामाजिक बळ एक सामाजिक ताकद संघटनेच्या पाठीशी असल्याचे दाखवून दिले त्यामुळे आता या महाराष्ट्र आधार सेनेच्या नावाची सर्वत्र चर्चा होत आहे राजकीय वतुर्ळात या महाराष्ट्र आधार सेनेचा बोलबाला होत असताना दिसत आहे वडवणी तालुक्यातील चिंचाळा डुकडेगाव या गावी शाखाची उद्घाटन करण्यात आले गावांमध्ये ढोल ताशाच्या मिरवणुकीमध्ये महापुरुषांची चौकाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले महाराष्ट्र आधार सेनेचे संस्थापक दीपक थोरात यांनी सांगितले की ना जातीचा ना धर्माचा एक हात मदतीचा म्हणून महाराष्ट्र आदर सेनेचा ब्रीदवाक्य घेऊन आज जनसेवेसाठी ही सामाजिक संघटना काढलेली आहे येणाऱ्या काळामध्ये नक्कीच





सत्तेतल्या नेत्यांना अठरापगड जातीला न्याय मिळवून देण्यासाठी शेतकरी दलित मागासवर्गीय समाजाचे प्रश्न शासन दरबारी मांडणार आहोत येणाऱ्या काळामध्ये महाराष्ट्र मध्ये होणारे अन्याय अत्याचार व जातीयवादाचे विरोधामध्ये महाराष्ट्र आधार सेना ही उभा राहणार आहे यावेळी वडवणी तालुक्यातील चिंचाळा व डुकरे गाव येथील शेकडो कार्यकर्ते यांनी महाराष्ट्रात सेनेमध्ये प्रवेश केला यावेळी मांग महार बंजारा वंजारी मराठा मुस्लिम धनगर गोपाळ सह अठरापगड जातीतील कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र आधार सेनेच्या पाठीशी उभा राहण्याला पसंती दर्शविली आहे महाराष्ट्र आधार सेना, संस्थापक अध्यक्ष दिपक थोरात कार्याध्यक्ष उद्धव आरे सतीष (आप्पा) हानवते (तालुका प्रमुख) प्रशांत गव्हाणे (शहर उपाध्यक्ष) वापू आवाड (शाखाध्यक्ष) अनिल आवाड (युवा जिल्हा उपाध्यक्ष) सचिन पाटोळे (तालुका कार्याध्यक्ष) शक्ती आवाड(उप शाखाध्यक्ष) अशोक (आबा) वाघमारे (युवा नेता, बीड) सखाराम आवाड (शाखा सचिव) उमेश आवाड (उसतोड कामगार अध्यक्ष) अर्जुन सरवदे (युवा शहराध्यक्ष) अर्जुन पाटोळे (उसतोड कामगार तालुकाध्यक्ष) अभिषेक आडागळे (बडवणी तालुका विध्यार्थी आघाडी) चिंचाळा शाखा साहेबराव आडे (शाखाध्यक्ष) अण्णासाहेब आवाड (उप शाखाध्यक्ष) नितीन मोरे (शाखा सचिव) शाखा नं.०२ डूकडेगाव शाखाध्यक्ष बापू आवाड उप शाखाध्यक्ष) शक्ती आवाड (शाखा सचिव) सखाराम आवाड अशोक हतागळे करण सरवदे अमोल मजमले. मिलिंद पाटोळे, गणेश कार्यक्रम यशस्वी करण्यासाठीअशोक हतागळे, करण सरवदे, अमोल मुजमुले, मिलिंद पाटोळे, गणेश करपे, सखाराम आवाड, किरण तिडके, सतीष बडे, आबासाहेब बडे, रमेश आवाड, सुशांत मुरकुटे, शक्ती आबाड, संजय आवाड, नारायण आवाड, प्रल्हाद आवाड, बापु आवाड, कुमार आवाड, हर्षवर्धन आवाड, सचिन लोखंडे, दीपक आवाड, शिवा आवाड, महादेव आवाड, लहू आवाड, विकास लोंढे, नादु शेख यावेळी असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते

# झोडेगाव परिसरात कापूस लागवडीला वेग



जून महिन्याच्या सुरुवाती पासून पेरणी योग्य पाऊस झाल्यानंतर गेली दोन पावसाने उघडीप दिल्याने अंबड तालुक्यातील झोडेगाव शिवारात कापूस लागवडीची लगबग सुरू आहे. प्रत्येकाच्या शेतात बळीराजा लागवड करतांना दिसत आहेत. यावर्षी लवकर लागवडी योग्य पाऊस झाला आणि शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याने शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी केले आणि लागवडीला सुरुवात केली. मात्र बहूभूधारक शेतकरी मात्र मजूर भेटत नसल्याने टोकण यंत्राच्या साहाय्याने कपाशी लागवड करतांना दिसले. झोडेगाव येथील युवा शेतकरी विश्वजित दोरके आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना म्हणाले " यावर्षी पाऊस लवकर पडला. पेरणीयोग्य ओल गेल्यावर आम्ही लागवडीकडे वळलो. बहूभूधारक शेतकऱ्यांना मात्र मजूर टंचाईचा फटका बसतो म्हणून आम्ही यांत्रिकीकरण स्वीकारले आहे. यावर्षी आम्ही टोकण यंत्राच्या साहाय्याने लागवड करत आहोत. पुढेही पर्जन्यमान चांगले राहून खरीप हंगाम साधला जाईल अशी आशा त्यांनी बोलतांना व्यक्त केली.

# कुमारी कस्तुरी प्रशांत मस्के

## विदर्भ गौरव पुरस्कार-2025 सन्मानित



प्रतिनिधी प्रांजली प्रविण काळबेंडे नागपूर दि.१४ जुन २०२५ पुसद येथील समर्थ इंग्लिश मीडीयम स्कूल मधील अवघ्या चार वर्षांची चिमुकली शिवकन्या कुमारी कस्तुरी प्रशांत मस्के विदर्भ गौरव पुरस्कार -२०२५ देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले आहे आहेत वीर शिव छत्रपती संघटना व एस आर एन फिल्मस प्रोडक्शन व न्युज इंडिया २४ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विदर्भ गौरव पुरस्कार सोहळा २०२५ नागपूरात दि.१४ जुन २०२५ ला कविवर्य सुरेशभट्ट सभागृहात दिमाखदार सोहळ्यात पार पडले या या कार्यक्रमात प्रमुख अतिथी श्रीमंत राजे मुधोजी भोसले महाराजा ऑफ नागपूर,श्री अशोक जी बागुल डी वाय एस पी नागपूर शहर श्री सुमित राठोड निसर्ग प्रेमी नागपूर सोबत महाराष्ट्रातील सिनेक्षेत्रातील ,कला ,साहीत्य शिक्षण क्षेत्रातील व संपुर्ण महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजक श्रीमंती शितल नंदनवार मॅडम सिनेअभिनेत्री व न्युज इंडिया-२४ इंडीटर ,श्री सागर निकम सर सिनेअभिनेते , दिग्दर्शक सोनी मराठी, झी मराठी,जिवा शिवा ,श्रीमंती दिक्षा देशमुख मॅडम प्राटेकशन मॅनेजर एस आर एन फिल्मस प्रोडक्शन यांच्या कडुन संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले होते कस्तुरी ही अवघ्या चार वर्षाची असुन त्यानी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर संपूर्ण माहीती अवघ्या पाच मीनीटात सादरीकरण केली आता हे खुप नवल वाटत की चार वर्षांची मुलगी हा पण हे अगदी खरं आहे सौ.रोहीनी प्रशांत मस्के यांची मुलगी असुन या शिक्षीका आहेत आपल्या मुलीला लहानपणापासू शिक्षा देत आहे नागपूर येथे झालेल्या कार्यक्रमात कस्तुरी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित शंभर प्रश्नांची माहीती दिली यात छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुर्ण नाव जन्म कधी झाले कुठे झाले आईचे नाव भावाचे नाव मुलांचे नाव पत्नीचे नाव जन्म कोणत्या गडावर झाला कोणता गड पाहीले जिंकले त्यांचे यावळे याचे नाव अशी सर्व माहीती अगदी पोपटासारखी पटापट देते सर्वानी या बाळाचे बोलने ऐकुन टाळ्यांच्या कडकडाटात केला या निमीत्त या बाळाचे सन्मान श्री अशोक जी बागुल डी वाय एस पी नागपूर शहर यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी आई रोहीनी भाऊ पवन नारे सुमित राठोड सौ. सपना राठोड आदी उपस्थित ह़ोते रोहीनी यांनी आयोजकांचे मनापासून आभार व्यक्त केले आहे.

# ठेवी गेलेल्या पैशांसोबत गेले वडिलांचे प्राणही; मुलीच्या संसारासाठी साठवलेली आशा फाशीच्या दोऱ्याशी गाठली..!

गेवराई । प्रतिनिधी गेवराई तालुक्यातील खळेगाव येथे एक अत्यंत हृदयद्रावक आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. सुरेश आत्माराम जाधव (रा. खळेगाव) या ठेवीदाराने छत्रपती मल्टीस्टेट बँकेच्या गेटला गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांच्या आत्महत्येमुळे परिसरात शोककळा पसरली असून, मल्टीस्टेट बँकांवरील विश्वासार्हतेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. जाधव यांच्या छत्रपती मल्टीस्टेट बँकेत ११ लाख तर ज्ञानराधा मल्टीस्टेट बँकेत ५ लाख रुपये ठेवले होते. त्यांच्या मुलीच्या लग्नासाठी त्यांना तातडीने पैशांची गरज होती. मात्र अनेक दिवसांपासून बँकेच्या सातत्यपूर्ण फेर्या मारूनही त्यांना ठेवलेली रक्कम परत मिळाली



> माझ्या मुलांच्या शिक्षणाचे तुम्ही वाटोळे केल्याबद्दल धन्यवाद, एवढा अंत एखाद्याचा बघू नये, खरी परिस्थिती जाणून घ्यायला हवी होती. वेळोवेळी पैसे मागवून देखील तुम्ही पैसे देत नाहीत, म्हणून मी तुमच्यासमोर आत्महत्या करत आहे, याचा निरोप चेअरमन संतोष भंडारी व भंडारी दादा यांना द्या, असे आत्महत्या करण्यापूर्वी सुरेश जाधव यांनी छत्रपती मल्टीस्टेटच्या शाखा व्यवस्थापक ज्योती यांना व्हाट्सएप मेसेज टाकून गळफास घेत जीवन संपवले.

नाही. बँक व्यवस्थापनाकडून वारंवार विनवण्या करूनही कोणतंही समाधानकारक उत्तर न मिळाल्याने जाधव मानसिक तणावात होते. बुधवारी रात्री उशिरा जाधव आपल्या कुटुंबासह बँकेत गेले होते. काही वेळातच त्यांनी छत्रपती मल्टीस्टेट बँकेच्या गेटला गळफास घेऊन आत्महत्या केल्याचं स्पष्ट झालं. ही घटना उघडकीस आल्यानंतर संपूर्ण गावात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.या प्रकरणामुळे मल्टीस्टेट सहकारी बँकांच्या कार्यपद्धतीवर व त्यांच्या आर्थिक पारदर्शकतेवर मोठं प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन ठोस कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आह

# सोन्याचे दुकाणातुन दागिने चोरणारी मुर्शदपुर येथील महीलांची टोळी जेरबंद

बीड । प्रतिनिधी सोन्याच्या दुकानात घुसून गर्दीचा फायदा घेत दुकानातील सोन्याची चैन आणि दागिने चोरीच्या घटना वाढल्या होत्या याप्रकरणी एलसीबीच्या पथकाने याचा शोध लावत सोन्याचे चैन आणि दागिने चोरणारी महिलांची टोळी एलसीबीच्या पथकाने जेरबंद केली आहे दिनांक १७.०६.२०२५ रोजी कुंदन बालासाहेब जोगदंड, वय २३ वर्ष, रा कानडी रोड, केज यांनी पोलीस ठाणे केज येथे फिर्याद दिली की, त्याचे स्वतःचे श्री ज्वेलर्स नामक दुकाणामध्ये अज्ञात चार महीलांनी गि-हाईक म्हणून येऊन पायातील चांदीची चैन विकत घ्यायची आहे दाखवा असे म्हणून बऱ्याच चांदीच्या चैन पाहील्या व फिर्यादीची नजर चुकवून चांदीच्या चैन चोरुन नेल्यावरुन त्याचे फिर्यादीवरुन पोलीस



ठाणे केज येथे गुन्हा नोद करण्यात आला होता.सदरील दाखल गुन्हयाचे अनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक बीड यांनी सदरील गुन्हा उघडकीस आनण्याचे सुचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या, त्या नुसार स्थानिक गुन्हे शाखेने गुन्हा उघडकीस आनण्याचे प्रयत्न सुरु केले असता दिनांक १७.०६.२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, चोरीस गेलेला चांदीचे चैन जोड चोरलेल्या महील्या हया चांदोच्या चैन विक्री करण्यासाठी कोठे तरी जात असून सध्या बसची वाट पाहत नगर नाका, नगर रोड, बीड येथे उभ्या आहेत अशी खात्रीलायक बातमी मिळाली. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने लागलीच सदर ठिकाणी जावुन छापा मारुन १) सुमन पोपट येडवे, वय ५२ वर्ष, २. कलावती मोतीरामकेंगार, वय ५६ वर्ष, ३. बबीता भाऊराव केंगार, बय ६१ वर्ष, ४. व्दारकाबाई सतीष बोराडे, वय ४० वर्ष, सर्व रा.मुर्शदपुर ता.जि.बीड यांना ताब्यात घेतले व त्याचे कडे असलेल्या पर्समध्ये पाहोले असता पर्समध्ये चोरीस गेलेले चांदीचे चैन दिसुन आल्या, त्यांनी सदरील चैन केज येथील सोन्याचे दुकाणामधुन चोरल्याचे कबुल केले, त्याचे कडुन चोरीस गेलेले चांदीचे चैन जप्त करुन महीला आरोपी व चांदीचे चैन पुढील तपासकामी पोलीस ठाणे केज यांचे ताब्यात दिले आहेत सदरील कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक, सचिन पांडकर, अपर पोलीस अधोक्षक, श्री शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारोती कांबळे, विकास राठोड, विष्णु सानप, सचिन आंधळे, महीला पोलीस स्वाती मु ंडे, चालक नितीन वडमारे यांनी केली आहे.

# अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र डिजिटल स्वाक्षरीने मिळविण्यासाठीची अट रद्द करा

बीड । प्रतिनिधी शासन निर्णयाच्या अनुषंगाने सेवेत सादर की , राज्यातील अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांचे जुलै २०१७ पुर्वीचे ऑफलाईन प्रमाणपत्र संदर्भीय शासन निर्णयानुसार आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन डिजिटल स्वाक्षरीने मिळविण्यासाठी अर्ज करावे असे आदेश दिलेले आहेत. सदर शासन निर्णयात म्हटले आहे की , ऑफलाइन अल्पसंख्याक दर्जा प्राप्त शाळा व संस्थांचा तपशीलवार माहिती शासनाकडे उपलब्ध होत नाही ही माहिती सुलभरित्या उपलब्ध व्हावी यासाठी जुलै-२०१७ पूर्वी ज्या अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी ऑफलाइन अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र प्राप्त करून घेतलेले आहेत अशा सर्व संस्थांनी डिजिटल स्वाक्षरिचे प्रमाणपत्र शासन निर्णयाचृया दिनांकापासुन ६ महीन्यात काढुन घ्यावे असे आदेश दिलेले आहेत.



वास्तविक अल्पसंख्याक संस्थांची सखोल माहिती शासनाने सन २०१५ मध्ये अल्पसंख्याक दर्जा प्राप्त संस्थाची/शाळांची संपूर्ण माहीती ऑनलाईन मागविण्यात आलेलेली असून ऑफलाइन माहीती अल्पसंख्याक विकास विभाग व शालेय शिक्षण विभागाकडे उपलब्ध असते. सदरची प्रक्रिया अन्यायकारक आहे या मुळे अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था चालका मध्ये तीव्र नाराजगी निर्माण झाली आहे. ही जाचक अट रद्द करून जुलै-२०१७ पूर्वीचे अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र ग्राह्यधरुण सुट देण्यात यावी करिता उपरोक्त शासन निर्णयातून सुट देऊन ही अट रद्द करणे बाबतचे उपमुख्यमंत्री मा.ना.श्री.अजित दादा पवार सा हे ब , मा.ना.श्री.दत्तात्रय दादा भरणे साहेब अल्पसंख्याक मंत्री यांना शिफारस करण्यासाठी एक शिष्टमंडळाने असे नि वे द न *मा. आमदार श्री इद्रीस नायकवडी साहेब सदस्य विधान परिषद यांना . देऊन त्यात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस आय अल्पसंख्याक विभाग चे प्रदेश सरचिटणीस कैसर आझाद शेख , राष्ट्र वादी काँग्रेस (अजित पवार)चे अल्पसंख्याक विभाग प्रदेश कार्याध्यक्ष मूबीन सिद्दीकी, अहेमद अली,हसिन अख्थर बिडकर, अदी नेते उपस्थित होते.

# जिल्हा पोलीस प्रशासन आणि परिवहन अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने ३१ रिक्षाचालकांवर दंडात्मक कार्यवाही


बीड प्रतिनिधी काल दि.१६ जून आणि आज १७ जून २०२५ रोजी जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन, आणि परिवहन अधिकारी स्वप्नील माने,प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री बालाजी धन्वे यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त विद्यमाने ३१ रिक्षाचालकांवर वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष आणि पोलीस उपनिरीक्षक विजय यांच्या अधिपत्याखाली शहरातील विविध भागात वैध कागदपत्र नसलेल्या इतर जिल्ह्यातील भंगारात काढण्यात आलेल्या रिक्षावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली. याबाबत सविस्तर माहिती अशी की, काल पासून आज पर्यंत पोलीस प्रशासन आणि परिवहन विभागाच्या संयुक्त विद्यमाने एकुण ३१ रिक्षाचालकांवर कारवाई करण्यात आली असून बीड शहरात अनेक अवैध रिक्षा असून त्यामध्ये कागदपत्रांची पुर्तता नसलेले, विमा नसलेले, परमिट नसणारे रिक्षा, पीओसी प्रमाणपत्र नसलेले, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेवून जाणारे ज्यामध्ये नागरिकांचा जीव देखील धोक्यात येवू शकतो अशा रिक्षा चालकांवर



दंडात्मक कारवाई करण्यात आली यावेळी यावेळी सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक पवन गायके, सहाय्यक मोटर निरीक्षक भूषण पेटकर , वाहन चालक लक्ष्मण पांगरे, कैलास दराडे, अशोक कंटाळे यांच्यासह जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस हवालदार आदिनाथ, विष्णू, राजाभाऊ, पांडूरंग, शिवदास, सखाराम, पोलीस अंमलदार विश्वजीत, सिध्दार्थ, अनिकेत, वसीम, ड्र ायव्हर पोलीस हवालदार संतोष, ड्र ायव्हर पोलीस अंमलदार दत्ता, पोलीस कर्मचार्यांनी कार्यवही केली आहे. दरम्यान पोलीस प्रशासनाकडून आणि परिवहन विभाग नियमात राहुन सर्व कागदपत्रांची पुर्तता रिक्षाचालकांनी/ वाहनधारकांनी करावी आणि क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी न घेवू जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्हा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या शाळा प्रवेशांच्या स्वागताचा इव्हेंट बंद करून धोकादायक, मोडकळीस आलेल्या सरकारी शाळांना भेटी देऊन मुलभूत सुविधा द्याव्यात:- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.१७ ) बीड जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागाने आयोजित काल दि.१६ सोमवार रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सवात जिल्हाधिका-यांचे १०० अधिकारी आणि लोकप्रतिनिधी शाळांमध्ये हजर राहिले यात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन कारेगव्हाण येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत, मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांच्यासह शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी ( माध्यमिक) संजय पंचगल्ले, उपशिक्षणाधिकारी भगवान सोनावणे,शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर तोडकर, आदींनी नविन प्रवेशित विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याच वेळी
बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या अकरा तालुक्यातील ३४९ शाळांच्या ५९२ वर्गखोल्या अत्यंत धोकादायक असुन ४६८ शाळांमधील ८५६ वर्गखोल्यांची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक असुन ग्रामीण भागातील ७७२ शाळांना वीजपुरवठा नाही तर थकीत वीज बिलामुळे ६२० शाळांमधील वीजपुरवठा खंडित केला असुन विद्यार्थ्यांचे संगणक,ई लर्निग,वीज उपकरणे बंद असल्याने डिजिटल शैक्षणिक नुकसान होत असुन तातडीने उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली असुन जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागाने इव्हेंट करण्यापेक्षा बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या धोकादायक व मोडकळीस आलेल्या शाळांना भेटी देऊन शाळांची दुरूस्ती व पुनर्बांधणी करण्यात यावी अशी मागणी केली आहे.सविस्तर माहितीस्तवबीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २४७४ शाळा असुन यात २४१५ शाळा प्राथमिक तर ५९ शाळा माध्यमिक आहेत.जिल्ह्यात ११ तालुक्यातील ३४९ शाळांच्या ५९२ वर्गखोल्या धोकादायक असुन मोठा पाऊस अथवा वादळवारे आल्यास धोका निर्माण होऊ शकतो.जिल्हा परीषदेच्या शाळांच्या ईमारतीची दुरावस्था असुन कुठे भिंती कुजलेल्या अवस्थेत तर कुठे छत उघडे पडलेले तर कुठे दरवाजे, खिडक्या मोडकळीस आलेल्या अवस्थेत आहेत. गेल्या अनेक वर्षापासून शाळा, वर्गखोल्यांची दुरुस्ती आवश्यक असताना लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष झाल्याने तसेच वेळेवर निधी उपलब्ध न झाल्याने शालेय मुलांची अडचण होत असुन दुर्घटना घडल्यास यास जबाबदार कोण?? लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाकडून विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ सुरू आहे त्यामुळे तातडीने धोकादायक शाळांच्या दुरूस्तीसाठी निधी देण्यात येऊन तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी. बीड जिल्ह्यातील तालुका निहाय मोडकळीस आलेल्या शाळा खालिल प्रमाणे आहेत.





आष्टी तालुका ८० शाळांमधील ११९ वर्गखोल्या, अंबेजोगाई तालुक्यातील १६ शाळांमधील ३० वर्गखोल्या, बीड तालुक्यातील २८ शाळांमधील ३७ वर्गखोल्या,धारूर तालुक्यातील १७ शाळांमधील ३० वर्गखोल्या,केज तालुक्यातील १९ शाळांमधील २२ वर्गखोल्या, गेवराई तालुक्यातील ६२ शाळांमधील १२५ वर्गखोल्या, माजलगाव तालुक्यातील १३ शाळांमधील २६ वर्गखोल्या, परळी तालुक्यातील ४६ शाळांमधील ८८ वर्गखोल्या, पाटोदा तालुक्यातील ३१ शाळांमधील ४० वर्गखोल्या, शिरूर तालुक्यातील २४ शाळांमधील ३२ वर्गखोल्या, वडवणी तालुक्यातील १३ शाळांमधील ४३ वर्गखोल्या एकुण ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या असुन त्यांची तातडीने दुरुस्ती आवश्यक आहे.

## वायकर वस्ती येथे छत पडलेल्या वर्गात ज्ञानार्जन

बीड तालुक्यातील मांडवजाळी ग्रामपंचायत अंतर्गत पिंपळवाडी केंद्र अंतर्गत वायकर वस्ती येथील शाळेच्या एका वर्गाचे छत पुर्णपणे कोसळले असुन सध्या ज्या वर्गात मुलं ज्ञानार्जन करत आहेत त्या वर्गातील छत पडण्याच्या अवस्थेत असुन मुलांच्या जिवीताला धोका असुन शेतकरी ऊसतोड मजुरांच्या लेकरांनी पावसाळ्यात शाळा उघड्यावर कशी शिकायची असा संतप्त सवाल पालक दादु पवार,सुशीला बहिरवाळ, अमोल बहिरवाळ यांनी केला आहे. शाळांमधील वीजबील थकीत असल्याने ४९७ शाळांमध्ये वीजपुरवठा खंडित असुन तातडीने वीज पुरवठा करण्यात यावा बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ग्रामीण भागातील ७७२ शाळांना वीजपुरवठाच नाही तर जिल्ह्यातील ४९७ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांकडे १ कोटी ३ लाख ४५ हजार रुपयांचे वीज बिल थकीत असल्याने महावितरण कंपनीने वीज कनेक्शन कट करण्याची कारवाई केली आहे. त्यामुळे संगणक,ई लर्निग,एल ई डी टीव्ही, डिजिटल बोर्ड तसेच वीजेची उपकरणे बंद असल्याने विद्यार्थ्यांचे डिजिटल शैक्षणिक नुकसान होत आहे तसेच बहुतेक शाळात अंधार आहे.अनेक शाळांच्या मागील भागात गवत आणि झाडेझुडपे असतात त्यातुन कधी विंचु तर कधी सापही शाळेत येतात. अंधार असल्याने अनेकदा दिसत नाहीत.वीज असेल तर अशा प्रकारचा धोका होणार नाही.शासनाने या विषयाकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.

बीड/महाराष्ट्र
आंतरराष्ट्रीय विशेष
दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरवार १९ जून २०२५
https://lokaarambh.com


# इराण-इस्त्रायल युद्धात अमेरिकेची एन्ट्री?
# डोनाल्ड ट्रम्प यांची हल्ल्याच्या योजनेस मंजुरी

इराण आणि इस्त्रायल युद्धाचा व्याप्ती वाढण्याची शक्यता आहे. या युद्धात आता अमेरिकेची एन्ट्री होणार आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर हल्लाच्या योजनेला मंजुरी दिली आहे. परंतु त्यांनी अंतिम आदेशाची वाट पाहण्यास सांगितले आहे. हल्ला करण्यापूर्वी इराण आपला अणुकार्यक्रम सोडण्यास तयार आहे की नाही हे पाहण्यास ट्रम्प यांनी सांगितले आहे. ट्रम्प यांनी त्यांच्या वरिष्ठ सहकाऱ्यांसोबत एक महत्त्वाची बैठक घेतली. या दरम्यान त्यांनी हल्ल्याला या योजनेला मान्यता दिली. ट्रम्प यांनी काय म्हटले? रॉयटर्सने दिलेल्या रिपोर्ट या अहवालात स्ट्रीट जर्नलच्या हवाला देण्यात आला आहे. बैठकीला उपस्थित असलेल्या तीन जणांनी या अहवालात याबद्दल सांगितले आहे. रॉयटर्सने म्हटले आहे की, इस्त्रायली हल्ल्यांमध्ये अमेरिकेच्या सहभागी होण्याच्या धमकीमुळे तेहरान आपला अणुकार्यक्रम सोडून देईल, अशी अपेक्षा ट्रम्प यांना आहे. डोनाल्ड ट्रम्प



यांनी बैठकीपूर्वी, इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांना शरण

येण्याचा इशारा दिला होता. अन्यथा अमेरिका या हल्ल्यात सहभागी होईल, त्यानंतर त्याचे वाईट परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी ट्रम्प यांनी दिली. खामेनी यांच्याकडून उत्तर अयातुल्ला अली खामेनी यांनी अमेरिकेच्या इशारा धुडकवून लावला. त्यांनी म्हटले की, इराण आणि इराणचा लोकांचा इतिहास माहिती असणारे आम्हाला धमकी देऊ शकत नाही. इराण कधी या धमक्यांना घाबरणार नाही. अमेरिकेच्या हल्ल्यालाही जोरदार उत्तर दिले जाईल. अमेरिकेचेही मोठे नुकसान होईल. अमेरिकेत दोन गट राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर हल्ला करण्यास मान्यता दिली आहे. परंतु ज्या लोकांनी त्यांना राष्ट्राध्यक्ष होण्यासाठी मदत केली आहे, त्यांना अमेरिका मध्य पूर्वेतील या युद्धात ढकलला जावा, असे वाटत नाही. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, ट्रम्प यांना सत्तेत आणणाऱ्या समर्थकांमध्ये फूट पडली आहे. त्यांच्या काही समर्थकांनी त्यांना मध्य पूर्वेतील नवीन युद्धात देशाला अडकवू नये, असे आवाहन केले आहे.

## वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषद यंदा पुरस्कार देणार - बीड जिल्ह्यातल्या उत्कृष्ट मान्यवरांचा केला जाणार सन्मान

वडवणी/प्रतिनिधी वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या मुख्य कार्यालयात एक खास बैठक घेऊन तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने यंदा बीड जिल्ह्यातल्या उत्कृष्ट मान्यवरांचा सन्मान करत पुरस्कार देणार असल्याचा ठराव मंजूर करण्यात आला आहे. याबाबत अधिक वृत्त असे की, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा.श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे व जेष्ठ मार्गदर्शक सुधाकर पोटभरे यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदे च्या मुख्य कार्यालयात नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक घेऊन बैठकीत सर्वानुमते अनेक निर्णय घेण्यात आले. जेष्ठ मार्गदर्शक सुधाकर पोटभरे, तालुकाध्यक्ष सतिश सोनवणे, सचिव महेश सदरे यांनी आपल्या मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने बीड जिल्ह्यांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यासाठी प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाला सर्वांनी संमती दर्शवली असून बीड जिल्ह्यांत एकुण आकरा तालुक्यातील विविध क्षेत्रातील उत्कृष्ट काम करणाऱ्या मान्यवरांचा अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त खास कार्यक्रमाचे आयोजन करून राज्यातील मान्यवरांच्या उपस्थितीत विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. आपण केलेल्या आपल्या कार्याचा लेखाजोखा तपासणी करून पत्रकारीता,सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील कार्याचा आधार घेऊन आपले प्रस्ताव सादर करावेत. यासाठी प्रेस नोट प्रसिद्ध करणार आहोत. या पुरस्कारासाठी आपण उत्सुक असल्यास आपले प्रस्ताव कधी केव्हा,कुठे आणि कसे पाठवायचे याची संपूर्ण माहिती लवकरच देणार आहोत. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा वर्धापन दिन हा प्रत्येक वर्षी संपूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो. याच अनुषंगाने आम्ही वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने नवे ध्येय,नवी वाटचाल बीड जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देऊन सुरू करत आहोत. असा सर्वानुमते ठराव आम्ही संमत करून पत्रकारांच्या हिताच्या विविध विषयावर देखील सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीला डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे,जेष्ठ मार्गदर्शक पत्रकार सुधाकर पोटभरे,तालुकाध्यक्ष पत्रकार सतिष सोनवणे,सचिव पत्रकार महेश सदरे,उपाध्यक्ष पत्रकार धम्मपाल डावरे, डिजिटल मिडिया परिषदेचे तालुका अध्यक्ष संपादक ओमप्रकाश साबळे, कोषाध्यक्ष पत्रकार वाजेद पठाण,शहराध्यक्ष पत्रकार गितांजली लव्हाळे मॅडम,पत्रकार हरिभाऊ पवार, पत्रकार अतुल जाधव,पत्रकार संभाजी लांडे, पत्रकार राम चौरे, पत्रकार विजय राऊत सह आदींची उपस्थिती होती.

## बावी गावात कृषीदुतांचे आगमन

आष्टी : तालुक्यातील बावी येथे श्री. छत्रपती शाहू ,फुले आंबेडकर ,कृषी महाविद्यालयातील चतुर्थ वर्षातील विद्यार्थी कृषी दुतांचे बावी या गावात आगमन झाले आहे. यावेळी कृषीदुत रोहन शिंदे, सागर शिंदे,रितेश शिंदे, सुरज कदम,शुभम सावंत, अविनाश मुंडे ,अमन शेख, चैतन शिरसकर यांचे बावी गावातील गावकऱ्यांनी व शेतकरी बांधवांनी स्वागत केले कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम आरसुळ सर , प्रा. तांबोळी आय.एम ,प्रा. मिसाळ एल.एस यांच्या मार्गदर्शनाखाली कृषीदुतांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम २०२५ -२६ अंतर्गत शेतकऱ्यांना याबाबत सविस्तर माहिती दिली हे कृषीदुत २ महिने शेतकऱ्यांना शेती विषयी मार्गदर्शन करणार आहेत यावेळी गावचे सरपंच नवनाथ गर्जे आणि उपसरपंच भारत गोल्हार तसेच शेतकरी बांधव उपस्थित होत

## वाळू वाहतुक करणारा हायवा पोलीसांना पाहून कारवाईच्या भितीने पळाला

दिनांक १७/०६/२०२५ रोजी सकाळी ०८.०० वा. च्या सुमारास तेलगाव परीसरात वाळूची चोरटी वाहतूक होत असल्याचा प्रकार दिंद्रुड पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फत समजला. तेव्हा दिंद्रुड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे यांनी तात्काळ त्यांच्या साथीदारांना घेऊन खाजगी वाहनाने वाळू चोरांचे बातमीदारांना चुकवत मिळालेल्या माहितीप्रमाणे चोरीची वाळू वाहून नेणाऱ्या भारत बेंन्ज कंपनीच्या हायवा वाहनास पकडण्याचा प्रयत्न केला. परंतू हायवा चालकाने पोलीस येत असल्याचे पाहून तेलगाव ते परळी जाणाऱ्या रोडवरुन आपले वाहन चाटगावकडे नेऊन गावातील एका गल्लीतील घराजवळ रिकामा केला व तेथून पळून जात असतांना दिंद्रुड पोलीसांनी त्यास जागीच पकडून वाहन चालकासह हायवा पोलीस ठाणे दिंद्रुड येथे आणला. वाळू वाहतूक करणाऱ्या सदर वाहन चालकाकडे वाळुची रॉयल्टी नसल्याने हायवा चालक दत्ता परसराम थावरे, वय ५३ वर्षे, रा. आनंदगाव, ता. माजलगाव, जि. बीड याचे विरुध्द गुरनं. १५२/२०२५ कलम ३०३

## अनुसूचित जाती जमाती समितीचे सदस्य गोरख लोखंडे यांनी घेतला ऊसतोड महिला आरोग्य बाबतचा आढावा

बीड दि. १८) :- ऊसतोड कामगार महिलांच्या आरोग्याबाबत असलेल्या विविध समस्यांचा आज अनुसूचित जाती जमाती समितीचे सदस्य गोरख लोखंडे यांनी बीड येथे एका बैठकीत आढावा घेतला.


बीड येथील पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत त्यांनी याबाबत आढावा घेताना ऊसतोड महिला कामगार महिलांची ऊसतोडणीस जाण्यापूर्वी व तोडणी वरून परत आल्यानंतर अशा दोन्ही वेळा आरोग्य तपासणी करण्याच्या सूचना दिल्या.अवैधरित्या महिलांचा गर्भपात केला जातो अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत असे आढळून आल्यास त्याबाबत गुन्हा दाखल करण्यात यावा अशाही सूचना त्यांनी यावेळी दिल्या.आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी वेळोवेळी अचानकपणे खाजगी रुग्णालयांची तपासणी करावी तसेच सर्व खाजगी रुग्णालयांमध्ये तक्रार करण्यासाठीचा टोल फ्री क्रमांक दर्शनी भागात लावण्यात यावा असेही ते म्हणाले. ग्रामपंचायत गर्भवती महिलांची



माहिती आरोग्य विभागाने आशा सेविका तसेच अंगणवाडी सेविका यांच्या माध्यमातून गोळा करावी व यापुढील काळात अवैधपणे गर्भपात होणार नाहीत याची खबरदारी घ्यावी असेही लोखंडे यांनी यावेळी सांगितले.आज झालेल्या या बैठकीत नवनीत कौवत पोलीस अधीक्षक बीड, सचिन पांडकर अप्पर पोलीस अधीक्षक बीड, पूजा पवार प्रभारी पोलीस स्टेशन पिंपळनेर, डॉ संतोष शहाणे अतिरिक्त जिल्हा शिल्लचिकित्सक बीड, तत्त्वशील कांबळे सामाजिक कार्यकर्ते बीड, गोरे साहेब समाज कल्याण बीड नितीन पतंगे समाज कल्याण बीड आदींची उपस्थिती होती.

# बीड पंचायत समितीचा कारभार ढेपाळला, मस्टर झिरो झाल्यास पात्र लाभार्थ्यांचा मोर्चा पंस वर काढणार - धनंजय गुंदेकर

**३ हजार पेक्षा अधिक घरकुले, विहिरी, गायगोठे, शेवगा लाभार्थ्यांचे मस्टर झिरो करण्याचे बीडीओ कडून आदेश, लाभार्थ्यांकडून संताप**




बीड (प्रतिनिधी) बीड पंचायत समिती अंतर्गत रोजगार हमी योजनेतून हजारो कामे सध्या सुरू आहेत.. यामध्ये गेल्या २ आठवड्यातील वयक्तिक व सार्वजनिक कामांची मस्टर झिरो करण्याबाबत तत्कालीन गटविकास अधिकारी वानखेडे व विद्यमान गटविकास अधिकारी कांबळे यांनी पत्र काढले आहे.. जर हे मस्टर (हजेरी पत्रक) झिरो झाले तर वैयक्तिक लाभाचे घरकुल, गायगोठा, फळबाग (शेवगा, चंदन), जलसिंचन विहीर, शेततलाव यांसह सार्वजनिक मध्ये पांदण रस्ते, खडीकरण, विविध बांधकामे, सिमेंट रस्ते यांचे अकुशल पेमेंट होणार नाही.. त्यामुळे पात्र लाभार्थी यांचे प्रचंड मोठे नुकसान होणार आहे.. पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांकडून झालेल्या हलगर्जीपणाची सजा आता लाभार्थ्यांना मिळत असेल तर ही बाब खपवून घेतली जाणार नाही, जवळपास ५२१९ पेक्षा अधिक हजेरी पत्रके (मस्टर) झिरो करण्याची प्रक्रिया पंचायत समिती कडून सुरू झालेली आहे ती तत्काळ थांबवावी अन्यथा पंचायत समिती प्रशासनाच्या विरुद्ध लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा धनंजय गुंदेकर यांनी दिला आहे..

### पालकमंत्री अजित दादा.. तुमचे बीडीओ घरकुलाचे काम केलेली मजुरी झिरो करा म्हणत आहेत ?

पहिले मस्टर निघून ९० पेक्षा अधिक दिवस झाल्यास ते पुन्हा जनरेट होत नाही तर असे मस्टर झिरो झाल्यास त्यांना अकुशल मजुरी मिळत नाही.. मग अशात या २ हजार पेक्षा अधिक घरकुल धारकांना स्वतः बीडीओ हे प्रत्येकी २२ हजार रुपये खिशातून पैसे देणार आहेत का?

### एमबी झालेले मस्टर रोहयो कायद्यानुसार झिरो करता येत नाहीत? मग पत्र कसे काढले?

एमबी झालेले, व्हेज लिस्ट, एफटीओ केलेले मस्टर झिरो करता येत नाहीत. याला रोहयो कायदाचा आधार आहे मग बीड मध्ये बीडीओ मस्टर झिरो करण्याचे पत्रच कोणत्या आधारे काढत आहेत हे कळायला मार्ग नाही...



This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com